वि.दि.दावा क्र. १५४/२०२३
मंदाबाई ठाकरे वि. रामराव
निशाणी क्र.१०४

वादीतर्फे साक्षीदार क्र.३ ज्ञानेश्वर बालाजी उरकुडे,
मी शपथेवर सांगतो की,

**साक्षीदाराचा पुढील उलटतपास प्रतिवादी क्र. १, २, ८ आणि ९ तर्फे विधीज्ञ श्री. पालीवाल यांद्वारे –**

२. माझे शिक्षण सहावी पर्यंत आहे. मी खंडाळा येथे राहतो. मंदाबाई आणि रंगराव यांच्यासोबत आमचे घरगुती संबंध आहेत. मला साक्षसमन्स आले होते. वादींनी दावा कशासाठी दाखल केला आहे, याची मला निश्चित कल्पना नाही. मंदाबाई आज रोजी आली नाही. आज रोजी रंगराव आलेले आहे, मला बाहेर भेटलेले आहेत. मी शेतमजुरी करतो. रामरावच्या शेताला लागुन माझी शेती असल्याबाबतचा पुरावा मी दाखल केलेला नाही. घर वडीलोपार्जीत असल्याबाबतचा कोणताही कागदोपत्री पुरावा मी पाहिला नाही. हे म्हणणे खरे आहे की मंदाबाई आणि रंगराव यांच्या सांगण्यावरुन/म्हणत असल्यावरुन मी घर आणि शेती वडीलोपार्जीत असल्याचे मी म्हणत आले. हे म्हणणे खरे नाही की साक्षमधील माहिती मला रंगराव यांनी दिली आहे. रामराव यांना तिन मुल आणि चार मुली होत्या. रामरावजी तायवाडे हे गावातील प्रतिस्ठीत व्यक्ती होते व ते त्यांच्या मुला, मुलींना समान वागणुक देत होते. हे म्हणणे खरे आहे की रामराव हयात असतांना त्यांची सेवा, मोहन आणि त्यांची मुले करत होते. हे म्हणणे खरे आहे की मंदाबाईचे लग्न रामराव यांनी पार पाडले. हे मला माहित नाही की रामरावने लग्नाच्यावेळेस मंदाबाईला दागदागिणे आणि रोख रक्कम दिले होते. हे म्हणणे खरे आहे की रामरावच्या मालमत्यामध्ये मंदाबाईचा अधिकार नाही. हे मला माहित नाही की रामरावने त्यांच्या हयातीमध्ये मोहन आणि त्यांच्या मुलांना वादग्रस्त मिळकतीचे बक्षिसपत्र करुन दिले. वाद मिळकतीचे सर्वे क्रमांक मी सांगु शकत नाही तसेच घर मिळकतीचे सर्वे क्रमांक/घरक्रमांक सांगु शकत नाही. वाद मिळकतीचे क्षेत्रफळ सांगु शकत नाही. वादमिळकतीची चतुर्सिमा मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की आज रोजी मी वादीच्या सांगण्यावरुन खोटी साक्ष देत आहे.

**साक्षीदाराचा पुढील उलटतपास  इतर प्रतिवादीं करिता –**

इतर प्रतिवादी व त्यांचे वकील गैरहजर, सबब उलटतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

माझे समक्ष

SARODE SANDEEP MARUTI

L.A.R. No. 106-2005
Digitally signed by SARODE SANDEEP MARUTI
Location: Ramtek
Date: 2025.10.10 12:25:29 +0530

दिनांक ९.१०.२०२५
रामटेक

(एस.एम. सरोदे)
दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
रामटेक

# CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file of evidence are same word to word as per original evidence.

Name of Stenographer : R. J. khobragade (Gr.–II)